RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १३८ (१२)] गुरुवार, नोव्हेंबर ३, २०२२/कार्तिक १२, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४१०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२.

### अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक एमटीएस-०३१९ /प्र.क्र.२४५ /पोल-४.— महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) (चौथी सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ याच्या नियम ६ मध्ये, पोट-नियम (१) मधील, खंड (अ) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे, १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गांचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदांसाठी सन २०२० व २०२१ या कॅलेंडर वर्षांतील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेसाठी, एक वेळची उपाययोजना म्हणून, पात्र असतील".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शिरीष मोहोड,
शासनाचे उप सचिव.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

# HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 3rd November, 2022.

## *NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. MTS-0319/C.R.245/POL-4.— In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Maharashtra Police Act, 1951 (XXII of 1951) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) ( Fourth Amendment) Rules, 2022.

2. In rule 6 of the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, in sub-rule (1), in clause *(a)*, after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, due to Covid-19 pandemic, the candidates of all categories who have crossed the upper age limit during the period 1st January, 2020 to 31st December, 2022 shall be eligible for recruitment process to be conducted for filling up vacancies of the calendar year 2020 and 2021 for the said post by selection, as a one-time measure".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHIRISH MOHOD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner